श्री बाळासाहेब माने शिक्षण प्रसारक मंडळ, अंबप संचलित

# अशोकराव माने पॉलिटेक्निक

वाठार तर्फ वडगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. संपर्क : ९८८१३३३६४२

ए.आय.सी.टी.ई.- नवी दिल्ली, डी.टी.ई.-मुंबई मान्यताप्राप्त व एम.एस.बी.टी.ई.-मुंबई संलग्नित.

## First Year Facilitation Centre Coordinator

Mr. P.M. Patil

HOD Applied Science

Mobile: 9284183201

## Direct Second Year Facilitation Centre Coordinator

Mr. N.H. Mujawar

Senior Lecturer Department of Mechanical Engg.

Mobile: 9766436077/9503445488

लोकमत

# 'अशोकराव माने'मध्ये डिप्लोमा प्रवेश सुविधा

## विजयसिंह माने : ऑनलाईन पोर्टलच्या माध्यमातून प्रक्रिया

लोकमत न्यूज नेटवर्क

**खोची** : वाठार येथील अशोकराव माने तंत्रनिकेतनमध्ये प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया सुविधा केंद्र सुरू करण्यात आले आहे. शासनाच्या तंत्रशिक्षण संचालनालयाच्या वतीने ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून हे केंद्र सुरू करण्यात आले असून, तज्ज्ञ प्राध्यापक यासाठी मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती संस्था अध्यक्ष विजयसिंह माने यांनी दिली.

दहावीनंतर डिप्लोमा प्रथम वर्ष प्रवेश घेण्यासाठी ३० जून ही अंतिम तारीख निश्चित करण्यात आली आहे. तत्पूर्वी, ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून पॉलिटेक्निकसाठी प्रवेश घेण्यासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांना माहिती देणे व नोंदणी करण्याचे काम या सुविधा केंद्रातून सुरू केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शनासाठी येथे सातत्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येतो. अशोकराव माने शिक्षण संकुलातील सर्वच शाखांसाठी मार्गदर्शन करणारी अभ्यासू टीम कार्यरत आहे.



**वाठार येथे अशोकराव माने तंत्रनिकेतनमध्ये डिप्लोमा प्रथम वर्ष प्रवेशासाठी ऑनलाइन नोंदणी करताना विद्यार्थी गर्दी करीत आहेत.**

डिप्लोमासाठी प्रवेश घेणाऱ्यांना मोफत माहितीसोबतच नोंदणीच्या उपक्रमात कॉलेज आघाडीवर आहे. हे केंद्र शासनाच्या तंत्रशिक्षण संचालनालयाचे मान्यताप्राप्त आहे, याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन प्राचार्य वाय. आर. गुरव यांनी केले आहे.